न्यू ॲपोस्टोलीक चर्च
भारत

# उपकारस्तुतीचा दिवस २०२५

*“आणि बोलणे किंवा करणे, जे कांही तुम्ही करितां, ते सर्व प्रभू येशूच्या नामाने करा; आणि त्याच्या द्वारे देव जो पिता त्याचे उपकारस्मरण करा.” (कलस्सै ३: १७)*

प्रिय बंधूंनो व भगिनींनो,

आपल्या चर्चचा उपकारस्तुतीचा दिवस काही महिन्यांवर आला आहे. पूर्वी अनेकदा हा प्रश्न विचारला गेला की, उपकारस्तुतीच्या दिवसाची तयारी सुरू करण्याची योग्य वेळ कोणती? त्याचे उत्तर आहे: “आज आणि आत्ता!” उपकारस्तुतीच्या दिवसाची तयारी ही सतत, प्रत्येक दिवशी आणि संपूर्ण वर्षभर चालणारी आहे.

देवाविषयीची आपली कृतज्ञता कशी व्यक्त करावी यावर विचार करण्याची ही एक उत्तम संधी आहे. या वर्षाचे आपले बोधवाक्य याकडे स्पष्ट निर्देश करते की “चांगले करण्यासाठी वेळ देणे” याद्वारे देवाविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचे अनेक मार्ग आहेत. आपण जेव्हा येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बोलतो आणि वागतो, तेव्हा आपण त्याचा स्वभाव आणि त्याच्याशी असलेले आपले नाते प्रकट करतो.

येशू ख्रिस्ताच्या नावाने वागणे म्हणजे त्याची सेवा करणे, आपली प्रीती आणि विश्वास जाहीर करणे व आपण त्याचे आहोत हे दर्शविणे. आपला दयाळूपणा, क्षमा करण्याची तयारी, तसेच चर्चचे ऐक्य व विकास यासाठी दिलेले योगदान हे सर्व देवाबद्दलच्या कृतज्ञतेची साक्ष देतात.

देवाची महानता आणि त्याने आपल्यावर केलेल्या कृपेविषयी आमच्या स्वत:चे सखोल विचार आम्हाला उपकारस्तुतीकडे घेऊन जातात. आम्ही आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूत त्याच्या आध्यात्मिक व भौतिक दोन्ही स्वरूपाच्या देणग्या आणि आशीर्वाद यांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो. आपल्या प्रार्थना, ज्या डिवाइन सर्व्हिसेसमध्ये आम्ही उपस्थित असतो, आमच्या अर्पणांच्याद्वारे आणि त्याची व आमच्या शेजाऱ्यांची सेवा करणे यामध्ये आम्ही देवाविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो.

आपले लक्ष येशू ख्रिस्ताच्या पुनरागमनावर केंद्रित राहते, जे देवाने आपल्यासाठी सुरक्षित केलेले अद्भुत भविष्य आहे! जे आज, उद्या आणि अनंतकाळपर्यंत स्तुती व कृतज्ञतेस पात्र आहे.

आपल्या चर्चचा उपकारस्तुतीचा दिवस, रविवार, ५ ऑक्टोबर २०२५, हा न्यू अपोस्टॉलिक ख्रिस्ती म्हणून आपल्यासाठी विशेष महत्त्वाचा आहे. केवळ एका परंपरे शिवाय तो कृतज्ञतेची एक शिकवण आहे, तो आपले अंत:करण देवाकडे वळवण्याची संधी आहे आणि तो देव व चर्चबद्दल प्रीती व्यक्त करण्याचे माध्यम आहे. माझी ही इच्छा आहे की प्रत्येक लहान मुलाला, आपल्या सर्व युवक-युवतींना, त्यांच्या कुटुंबियांसह आपल्या सर्व सेवकांना आणि आपल्या सर्व सभासदांना, विपुल आशीर्वाद आणि त्यांच्या अंत:करणाची व उपकारस्तुतीच्या अर्पणांची तयारी करण्याद्वारे मिळणारा आनंद हा अनुभवता यावा.

कॅनडा विभागातील प्रेषितांसह आम्ही तुम्हाला, तुमच्या कुटुंबियांना आणि मंडळ्यांना उपकारस्तुतीचा दिवस आशीर्वादित असो अशा शुभेच्छा देतो.

आपला विश्वासू

मार्क वोल

न्यू ॲपोस्टोलीक चर्च
भारत

# वैयक्तीक आभाराचे पत्र

प्रिय बंधूंनो व भगिनींनो,

आम्ही या संधीचा उपयोग प्रेषित आणि सेवक म्हणून मागील २५ वर्षापासून कार्य करत असताना तुम्ही आम्हाला देऊ केलेले तुमचे प्रेम, सहकार्य, संयम, क्षमाशिलता आणि मैत्री यासाठी तुमचे मनापासून आभार मानण्यासाठी करतो. तरुणपणापासून जुळलेले हे आपले नाते-संबध आम्हां दोघांनाही खूपच प्रीय आहेत.

रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ रोजी मागरिट अव्हेन्यू येथे मुख्य प्रेषित श्नायडर डिव्हाइन सर्व्हिस घेणार आहेत. तिथे कॅनडा विभागाच्या चर्चचा १०० वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. त्या सर्व्हिसमध्ये आम्ही दोघे सेवानिवृत्त होऊ आणि प्रेषित मार्टिंग यांची जिल्हा प्रेषित म्हणून नियुक्ती होईल.

देवाच्या कार्यात ५० पेक्षा अधिक वर्षे सेवक म्हणून कार्य करणे ही आमच्यासाठी सन्मानाची आणि आनंदाची बाब ठरली आहे. तसेच येथे आणि परदेशातील अनेक मंडळ्यांम धील संडे स्कूलची मुले, आपले तरुण आणि आपले ज्येष्ठ सभासद यांच्या बरोबरील कार्या दरम्यान आम्ही जे अनुभवले, ते उर्वरीत आयुष्यामध्ये आमच्या आत्म्यात कोरलेले राहील. आमच्या मनात असलेल्या अनेक भावनांना व्यक्त करणे कठीण आहे. तथापि, सर्वशक्तिमान देवाने दिलेली प्रीती, कृपा आणि आशीर्वाद याबद्दलची कृतज्ञता हीच त्यातील प्रमुख भावना आहे.

आम्ही देवाच्या कार्याच्या भविष्यासाठी उत्सुक आहोत, जे प्रेषित मार्टिंग यांच्या नेतृत्वाखाली यापुढे चालणार आहे. आम चे सहकार्य आणि प्रार्थना त्यांच्यासोबत आहेत, तसेच त्या सेवकांसोबत सुध्दा आहे जे अजूनही आपल्या मंडळी आणि सभासदांची काळजी घेत आहेत. देव त्यांना भरपूर आशीर्वाद देवो, अशी आम्ही इच्छा बाळगतो.

गेल्या अनेक वर्षांत देवाच्या कार्यात अनेक बदल आम्ही अनुभवले आहेत. आपण सोबत राहून, मंडळ्यांचे विलीनीकरण आणि एकत्रीकरण पाहिले आहे, ज्याचा हेतू सक्रिय सदस्यांची सघनता वाढवणे व उत्साही मंडळी जीवन निर्माण करणे हा होता. प्रमुख शहरांमध्ये जमिनी विकत घेण्यात आल्या आणि चर्चच्या नवीन इमारती उभारण्यात आल्या. आजच्या काळातील गरजांना अनुरूप अशी कार्यक्षम इमारत आपल्या बंधू-भगिनींना मिळाली आहे याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. आपल्या चर्चचे प्रशासन आणि परदेशातील कामकाज अधिक सोपे केल्यामुळे योग्य दिशा निर्माण करण्यास मदत होत राहील. आपल्या मुलांच्या शिक्षण साहित्याचा विकास आणि प्रशिक्षण यावर नव्याने लक्ष केंद्रित करण्यात आले आहे हे पाहून आम्हाला आनंद होतो. देवाच्या कृपेने आम्ही आमच्या पूर्वजांच्या गुंतवणुकीवर त्याचे आशीर्वाद अनुभवले आहेत, ज्यामुळे भविष्यासाठी भक्कम पाया हा रचला गेला आहे.

देवाचे कार्य परिवर्तनशील आहे ज्यात बदल होणे सुरु राहणार आहे, आणि तसे होणे आवश्यकही आहे. आपण निश्चल राहू शकत नाही आणि ख्रिस्ताच्या प्रतिमेत वाढत असताना आपल्या विश्वासात सुध्दा वाढ व्हायलाच हवी. आपण केवळ ख्रिस्ताच्या वचनांचा पुनरुच्चार करू शकतो: *''तसेच तुम्हांस सांगितलेली सर्व कामे केल्यावर, आम्ही निरुपयोगी दास आहो, आमचे कर्तव्य तेच आम्ही केले, असे म्हणा.'' (लूक १७: १०).*

पुन्हा एकदा, तुमचे प्रेम आणि विश्वासूपणा याबद्दल आम्ही तुमचे मनःपूर्वक आभार मानतो. आम्ही आता ज्येष्ठांच्या श्रेणीत सामील होत असताना, मंडळ्यांमध्ये तुम्हा सर्वांना भेटण्यास उत्सुक आहोत.

आपला विश्वासू,

मार्क वोल आणि फ्रँक ड्झूर

**Thanksgiving**
5 October 2025
Marathi